# ।। प्रकरण पाचवे ।।

## प्रकरण पाचवे

आजपर्यंत प्रभाकर पेंढारकरांच्या लेखनावर त्यांनी लिहीलेल्या कादंबरीवरील समीक्षणात्मक लेखन झालेले नाही. क्वचित त्यांच्यावर लिहीलेले आढळते. त्यांनी लिहीलेल्या 'अरे संसार संसार' व 'प्रतिक्षा' दोन्ही कादंबरीवर समीक्षणात्मक अभ्यास प्रथमच केलेला आहे.

प्रभाकर पेंढारकर यांनी लिहीलेल्या कादंबरीचे एक वेगळेच विशेष प्रकर्षाने जाणवते. त्यांनी लिहीलेल्या कादंबरीमध्ये मांडलेला विषय हा विचार करण्यासारखा आहे. त्यांनी आपल्या कादंबरीमध्ये वेगळेच विषय मांडलेले आहेत. आजपर्यंतच्या मराठी कादंबरीमध्ये कधीही न आलेले विषय मांडलेले आहेत. तो विषय वेगळया प्रकारे हाताळलेला आहे. उदा.:- 'चिनार लाल झाला'. या कादंबरीत एक पाकिस्थानी वैमानिक भारतावर हल्ला करीत असताना त्याचे विमान पेटते. तो पॅराशुटच्याद्वारे काश्मिरमध्ये उतरतो. तेथे त्याला आसरा मिळतो. तो त्याठिकाणी लपून-छपून रहात असतो. त्यावेळी काश्मिरमधील लोकांचे जीवनमान तो पहातो. तसेच त्यांच्या विचारसरणीचा विचार करतो व तेथील लोकांची मनस्थिती त्याच्या लक्षात येते. मुद्दयाची निरर्थकता त्याला जाणवते व काही दिवसांनी तो काश्मिरी पोलीसांकडून मारला जातो.

तसेच त्यांच्या 'रारंगढांग' या कादंबरीचाही विषय वेगळाच पहावयास मिळतो. या कादंबरीमध्ये हिमालयातील सर्व चित्रण आलेले आहे. या कादंबरीतील नायक हा महाराष्ट्रीय आहे. तो लष्करामध्ये भरती होतो व तो हिमालयामध्ये लष्करासाठी पूल बांधण्याच्या कामासाठी जातो. हिमालयामध्ये काम करताना तेथील वातावरण, निसर्गसौंदर्य याचा परिणाम त्याच्या जीवनावर होतो. तेथील माणसे, त्यांचे राहणीमान, जीवनमान याचेही तो बारकाईने निरिक्षण करतो. हिमालयामध्ये झेलमसारख्या प्रचंड नदीवर पूल बांधत असताना त्यातून आलेले अनुभव या कादंबरीमध्ये आलेले आहेत. ते लेखकाने या कादंबरीमध्ये अगदी काटेकोरपणे मांडलेले आहेत.

'रारंगढांग' ही कादंबरी वाचताना प्रकर्षाने एक गोष्ट जाणवते ती म्हणजे कथानक चित्रपट कथेसारखे आहे. वेगवेगळी दृष्ये उत्कट व हृदयस्पर्शी प्रसंग खटकेबाज संवाद, माणसांच्या स्वभावाचे विविध नमुने, दबाव टाकणारे अधिकारी, द्रारिद्रयात पिडलेले कामसू कामगार, भयानक कडे कोसळती व या सर्वांच्या

तळाशी वाहणारा एक अत:प्रवाह पहावयास मिळतो. यातूनच एक बाब प्रकर्षाने जाणवते "जब आदमी मर जाता है, तो उसका क्या रहता है? एक यादगीश।"

एका बाजूला हिमालय आणि लहरी निसर्ग तर दुस-या बाजूला वेगवेगळी स्वभाव वैशिष्टये असणारी अनेक माणसे. मात्र ही सारी एकाच जिद्दीची . त्याठिकाणी निसर्ग आणि मानव यांच्यामध्ये रस्सीखेच चाललेली पहावयास मिळते. ही प्रक्रिया सतत चाललेली असते. या कादंबरीमध्ये अशाच निसर्गाशी झगडत असलेल्या माणसाची कथा गुंफली आहे.

बॉर्डर रोड ऑर्गनायझेशन हिमालयामध्ये ज्या उंचीवर रस्ते बांधत आहे या रस्ता बांधणीतील सर्वात महत्वाचा भाग म्हणजे उभ्या कडयातून रस्ता खोदुन काढण्याचा हा निव्वळ उभ्या कडयाचा स्थानिक भाषेत ढांग म्हणतात. एका बाजूस निसर्ग तर दुस-या बाजूला वेगवेगळया स्वभावाची पण सारख्या जिद्दीची माणसे पहावयास मिळतात. निसर्गाने आणि माणसाने जणूकाही रस्सीखेच चाललेली आहे. तसेच तेथील माणसा-माणसातील ही वस्तुस्थिती पहावयास मिळते.[2]

'प्रतिक्षा' या कादंबरीमध्ये वेगळाच विषय पहावयास मिळतो. कादंबरीमध्ये भारत-पाकिस्थान युद्धाची पार्श्वभूमी वर्णिलेली आहे. प्रभाकर पेंढारकरांनी कादंबरीमध्ये युद्धाच्या वेळची तेथील लोकांचे जीवन त्यांची पार्श्वभूमी आजपर्यंत दुस-या कोणत्याही कादंबरीमध्ये आलेली पहावयास मिळत नाही. हेच ह्या लेखनाचे वैशिष्टय मानावे लागेल.

लेखक अगदी वास्तववादी चित्रण करतो, फिल्म डिव्हिजनमध्ये काम करीत असताना लेखनाने संपूर्ण भारताचा प्रवास केलेला आहे. ज्याठिकाणी फिल्म तयार करावयाची आहे त्या त्याठिकाणी जाऊन तेथील परिस्थितीचे अवलोकन केलेले आहे. त्यांच्या 'प्रतिक्षा', 'रारंगढांग' आणि 'चिनार लाल झाला' या कादंबरीमध्ये ही वस्तुस्थिती पहावयास मिळते. त्याला अनेक लष्करी गोष्टीची माहिती करून घेतलेली आहे. तसेच या बाबीची अनेकांशी चर्चा केलेली आहे. त्यामुळे त्याच्या कादंबरीमध्ये विलक्षण अचुकपणा दिसुन येतो.

लेखकापाशी कॅमेरा आय आहे. त्यामुळे अति सूक्ष्म असे वर्णन लेखनाच्या लिखणात वारंवार

आढळून येते. फिल्म डिव्हिजनसाठी अनेक चित्रपट, अनुबोधपट तयार केल्यामुळे दिग्दर्शकाचा दृष्टीकोन लेखकाला आलेला आहे. तो त्यातून आपल्या कादंबरीतून मांडलेली आहे.

मराठी वांड्.मयामध्ये अनेक सामाजिक कादंब-या निर्माण झालेल्या आहेत. त्या कादंब-यातून वेगवेगळे सामाजिक प्रश्न मांडलेले आहेत. तशाच प्रकारची प्रभाकर पेंढारकरांची 'अरे संसार संसार' ही कादंबरी मध्यम वर्गाची मुंबईसारख्या शहरवासीयांच्यावर आधारलेली आहे. आज रोजी मुंबईसारख्या शहरांमध्ये घर घेऊन रहाते व आपला उदरनिर्वाह चालविणे हे किती कठीण होऊन बसते. त्याचे निदान या कादंबरीमध्ये आलेले आहेत. जर एखादयाने कर्ज काढून घर घेतले तर त्या कर्जाचे हप्ते भरत असताना त्याला किती यातना होतात. सुपर्ण घरप्रपंच चालविणे व घराचा हप्ता भरणे हे किती त्रासदायक होऊन बसते? त्यामुळे कुटूंबामध्ये एकसुद्धा मुल होऊ देणे हे सुद्धा त्यांना परवडणारे नाही. अशा प्रकारच्या समस्यांचा विचार 'अरे संसार संसार' या कादंबरीमध्ये अगदी वास्तव दृष्टीकोनातून मांडलेला आहे व कादंबरी वाचल्यावर आपल्यासमोर सर्व दृश्यच उभे रहाते.

'अरे संसार संसार' ही कादंबरी सामाजिक आहे. या कादंबरीमध्ये सर्व घटना प्रसंग कधी काळी लेखकाने एका चित्रपटाच्या लेख पाहिला होता. This picture is shot on location ....... and location is the shot of the a woman."
मधील गोष्ट 'अरे संसार संसार' ही कादंबरी हृदयावरील स्पंदनावर आधारलेली आहे. [3]

तसेच प्रभाकर पेंढारकरांनी दुसरी कादंबरी म्हणजे 'प्रतिक्षा' ही होय. ही कादंबरी पॅराशूट ट्रेनिंगवर एक शैक्षणिक चित्र तयार करण्याकरिता भारतीय छात्रधारी सैनिकाबरोबर दोन महिने राहण्याची संधी प्राप्त झालेल्यावर 'प्रतिक्षा' ही कादंबरी लिहीलेली आहे.

प्रस्तुत कादंबरीच्या नायकाला शेवटी झालेली जाणीव - A War brings out the best in man but most of the time, also the worst in man."
या विचार समस्यांची सैनिकाला कधी ना कधी जाणीव होतेच. युद्धातील रमणीयता, गौरव तेथेच संपतो आणि

उरते ती शोकांतिका. [4]

प्रभाकर पेंढारकरांची आणखी एक कादंबरी म्हणजे आणि 'चिनार लाल झाला'. ही कादंबरी फिल्म डिव्हिजनच्या अनुबोधपटाच्या निर्मितीसाठी लेखक काश्मीरला गेले असता तो ही कोलाहल काश्मीरच्या माणसाच्या हरवलेल्या आवाजाला शब्दरूप देण्याचा एक प्रयत्न। युद्धाच्या धुमश्चक्रीत माणुस म्हणून जगु पाहणा-या एका वैमानिकाच्या अनुभवांनी शब्दरूप देण्याचा प्रयत्न लेखकानी केलेला आहे.

हा वैमानिक पाकिस्थानात वायूदलाचा। त्याचे विचार अर्थातच पाक वैमानिकासारखे. ते तेथील मराठी वाचकांना रूचतिल न रूचतिल म्हणून ही कादंबरी दिवाळी अंकातून पूर्वी येऊनही पुस्तकरूपाने प्रकाशित होऊ शकली नाही. [5]

**निष्कर्ष :**

1) प्रभाकर पेंढारकर यांच्या साहित्याने मराठी साहित्यात निश्चितपणे वेगळेपणा दिलेला आहे. त्या जीवनाचे चित्रण आजपर्यंत मराठी साहित्यात आले नव्हते. ते युद्ध पार्श्वभूमी असलेले जीवन श्री. प्रभाकर पेंढाकर यांच्या कादंबरीतून पहावयास मिळते. एका वेगळया विषयावरचे दालन याठिकाणी खुले झाले आहे. प्रत्यक्ष युद्ध कसे असते याची झलक वाचकास पहावयास मिळते. 'युद्धस्य कथा रम्य' म्हणतात ते युद्ध खेळणा-यासाठी नव्हे याचाही साक्षात प्रत्यय प्रभाकर पेंढारकर यांच्या कादंब-या वाचताना येतो.

2) 'अरे संसार संसार' या सामाजिक कादंबरीत मध्यमवर्गीयांचा प्रश्नही तितक्याच बारकाव्याने त्यांनी मांडला आहे. मन पिळवटून टाकणारा शोकात्म अनुभव तर ही कादंबरी देतेच, त्याचबरोबर प्रस्थापित, सामाजिक व आर्थिक रचनेबद्दल विचारही करायला लावते.

3) एखादया सुंदर नक्षीदार चौकटीत तितकेच सुंदर चित्र लावलेले असावे तशा या कादंब-या आहेत. पाल्हाळ नसलेल्या, सुविहित, नेटकी रचना, संयमित शब्दात रेखाटलेली व्यक्तिचित्रे, त्याला अनुरूप अशी चटपटीत भाषाशैली आणि कथानकाची शिस्तबद्ध रचना ही त्यांच्या कादंब-यांची वैशिष्टये आहेत.

4) 'फिल्म डिव्हिजनमध्ये' काम करताना अनुबोधपट, वार्ताचित्रे निर्मितीसाठी सा-या भारतात भ्रमण करावे लागले. या कामाच्या निमित्ताने ठिकठिकाणी फिरत असताना दृष्टी, विचार व मन यांना अनुभव घेण्याचे एक विशिष्ट वळण लागले. वास्तववादी दृष्टीकोन तर मिळालाच पण थोडक्यात चित्रे काढण्याचीही सवय लागली. एखाद्या डॉक्युमेंटरीत थोडयाशा कालावधीत अनेक गोष्टींचे दर्शन घडवावे लागते, चित्र फ्रेमच्या बाहेर जाणार नाही याची काळजी घ्यावी लागते. लेखकाचे हेच वळण त्यांच्या कादंब-यातही जाणवते. 'कॅमेरा आय' चा असा अचूक उपयोग करणारा लेखक मराठीत विरळाच.

5) अनुबोधपट तयार करताना लेखकाला प्रत्यक्ष त्या त्या जागी चित्रण करावे लागते. तो 'स्पॉट' त्याच्या दृष्टीने अतिशय महत्वाचा असतो. कादंबरीलेखन करताना त्यांना या सवयीचा उपयोग झाला आहे. 'अरे संसार संसार' या कादंबरीतील व्यक्तिंना ते प्रत्यक्ष भेटले तसे ऑफिसही त्यांनी जाऊन पाहिले. त्यामुळे अत्यंत वास्तववादी असे त्यांचे लिखाण झाले आहे.

6) युद्धाची पार्श्वभुमी असलेल्या कादंब-या लिहीतानाही त्यांनी लष्करातील अनेक गोष्टींची महिती करून घेतली. तिथल्या अधिका-यांशी चर्चा करून अनेक गोष्टी समजाऊन घेतल्या. त्यामुळे त्यांच्या या कादंब-यात वर्णनाची अचुकता व सुक्ष्मता आढळते.

7) दोन्ही कादंब-यात सर्वत्र प्रथमपुरूषी निवेदन आहे. अशा निवेदनामुळे या कादंब-यांना एक वैशिष्ट्यपुर्ण परिमाण प्राप्त झालेले दिसते.

8) एकूण वेगवेगळया विषयावरच्या या दोन कादंब-या मराठी कादंबरी विश्वात आपले वेगळे स्थान राखून आहे.

SHIVAJI UNIVERSITY KOLHAPUR

## ** संदर्भ टिपा **

## ** प्रकरण पाचवे **


1. दैनिक सकाळ पुणे. ता. 28.8.82 मधील लेख.
2. 'सारंग ढांग' प्रभाकर पेंढारकर मौज प्रकाशक आवृत्ती 4 थी सन 1991 पृष्ठ क्र. 5
3. प्रभाकर पेंढारकरांचे ता. 29.3.93 चे पत्र क्र. 3.
4. 'प्रतिक्षा' प्रभाकर पेंढारकर विश्वकर्मा साहित्यालय पहिली आवृत्ती 1 फेब्रुवारी 1969 पृष्ठ क्र. 4 .
5. 'आणि चिनार लाल झालां' प्रभाकर पेंढारकर श्री विशाखा प्रकाशन प्रथम आवृत्ती 10 सप्टेंबर 1983 पृष्ठ 5